दिनांक 02/05/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.13

विषय – विटा नगरपरिषदेस कर विभागासाठी घरपट्टी,पाणीपट्टी वसुलीकरिता टॅब्लेट कॉम्प्युटर खरेदी करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी संगणक अभियंता यांची दिनांक 25/04/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी

केंद्र शासनाचे Ease of Doing Business धोरण व महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नागरिकांना नगरपरिषदेच्या सेवा या ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. याकरिता सदर सेवा ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यासाठी नगरविकास विभाग यांनी महाआयटी मार्फत Integrated Web Based Portal (IWBP) तयार करुन घेतले आहे. सदर पोर्टल मध्ये नागरी प्रशासन व सेवांची संबंधित एकूण 27 मॉड्यूल्स उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. सद्यस्थितीत 27 मॉड्यूल्सपैकी EoDB Compliance करीता 6 मॉड्यूल्स नगरपरिषदेत कार्यान्वित करुन त्याचा वापर करणे बंधनकारक करणेत आलेले आहे.

या अंतर्गत विटा नगरपरिषदेस सन 2023-24 या आर्थिक वर्षात नागरिकांना घरपट्टी, पाणीपट्टी बीले वाटप करणे सोयीस्कर व्हावे तसेच सदर बीले वाटप केल्यानंतर घरोघरी जाउन वसुली करणे, नागरिकांची नावे ऑनलाईन तपासणी करणे, भरलेल्या कर देयकाची संगणकिकृत पावती नागरीकांना त्या क्षणी देणे सोयीस्कर व्हावे तसेच रोजच्या रोज घरोघरी जाउन वसुल केलेल्या पावत्या पुन्हा कार्याल्यात येउन खतविणेची आवश्यकता न पडणेकरीता घरपट्टी व पाणीपट्टी वसुली लिपिकांना एकूण 8 टॅब्लेट कॉम्प्युटर खरेदी करणे आवश्यक आहे. तरी सदर GeM पोर्टलवर तपासणी केली असता 4GB RAM, 64 GB ROM स्पेसिफिकेशन असणाऱ्या एका टॅब्लेट कॉम्प्युटर चा 22,200/- एवढा दर आहे. तरी एकूण 8 टॅब्लेट चा 1,77,600/- एवढा खर्च अपेक्षित आहे. तरी विटा नगरपरिषदेस कर विभागासाठी घरपट्टी,पाणीपट्टी वसुलीकरिता 8 टॅब्लेट कॉम्प्युटर खरेदी करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा